# सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/ईबीसी/२०१६/ 3035

दिनांक :- 16 SEP 2016

प्रति,

**संचालक/प्राचार्य,**

सर्व शासकीय/अनुदानित व खाजगी कायम विनाअनुदानित

पदवीका/पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था,

अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासुन प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्ती योजनेबाबत सबंधित संस्थेनी विद्यार्थ्यांची यादी प्रमाणित करुन देण्याबाबत.**

संदर्भ :- मा.संचालक, तंशिस., म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- १५/अर्थस/ईबीसी/प्रमाणपत्र/२०१६-१७/८८ दिनांक ६ सप्टेंबर २०१६.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, आपण शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मधील प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्ती मिळण्याकरीता ई.बी.सी. अर्ज सबंधित जिल्हयातील शासकीय संस्थेकडुन तपासणी अधिकारी यांचेकडुन शासन निर्णय क्रमांक टीईएम/प्र.क्र.२१९/तांशि ४ दिनांक ३१ मार्च २०१६ नुसार तपासणी करुन घेऊन या कार्यालयास सादर केलेले आहे.

याबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मधील ई.बी.सी. पात्र धारक विद्यार्थ्यांना सबंधित योजनेचा लाभ मिळण्याचे दृष्टीने रुपये १००/- चे स्टॅम्पपेपरवर खालीलप्रमाणे प्रमाणपत्र प्राचार्यांचे सही शिक्यानुसार प्रमाणित करुन या कार्यालयास दिनांक २१/०९/२०१६ पर्यंत या कार्यालयास सादर करावे. तसेच लाभार्थी विद्यार्थ्यांची यादी सुध्दा सादर करावी.

१) ईबीसीसाठी अर्ज सादर केलेल्या यादीतील पात्र विद्यार्थ्यांचे सर्व पालकांचे उत्पन्न **रुपये १,००,०००/- (अक्षरी रुपये एक लक्ष फक्त)** चे आत आहे.

२) ईबीसीसाठी अर्ज सादर केलेल्या यादीतील सर्व पात्र विद्यार्थ्यांचा प्रवेश हा शासनाव्दारे आयोजित केलेल्या केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेव्दारे (CAP) झालेले आहेत.

३) ईबीसीसाठी अर्ज सादर केलेल्या यादीतील सर्व पात्र विद्यार्थी हे महाराष्ट्र राज्याचे अधिवासी आहेत.

४) ईबीसीसाठी अर्ज सादर केलेल्या यादीतील सर्व पात्र विद्यार्थ्याने फक्त ईबीसी या योजनेचा लाभ घेत असुन अन्य दुस-या कोणत्याही योजनेचा लाभार्थी नाही अथवा अर्ज सुध्दा केलेला नाही.

# सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३

५) ईबीसीसाठी पात्र विद्यार्थ्यांच्या यादीतील सर्व विद्यार्थ्यांचे आधारकार्ड काढलेले असुन त्यांच्या बँक खात्याशी लिंक केलेले आहे व तसेच पात्र विद्यार्थ्यांना ईबीसी रक्कम संस्थेकडुन सदर खात्यात ईसीएसव्दारे जमा करण्यात येईल. .

६) तसेच उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे दिनांक ३१ मार्च २०१६ रोजीच्या शासन निर्णयात नमुद केलेल्या सर्व अटी व शर्तीचे पालन करुनच ईबीसीसाठी पात्र विद्यार्थ्यांची यादी तयार करण्यात आलेली आहे.

तसेच याबाबत आपणास कळविण्यात येते की, वरील सर्व मुद्याची पुर्तता करण्याची आपली जबाबदारी राहील, याची सबंधित संस्थाप्रमुखांनी नोंद घ्यावी. तसेच वरील सहाही मुद्याबाबत संस्था प्रमुखांनी प्रमाणपत्र प्रमाणित करुन या कार्यालयास सादर करावे.

सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.